जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ Email id:- rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८

संदर्भ:-१. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५दिनांक १४ मार्च २०२०
२. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७
३. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
४. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ३०,३३,३४,४१ व ५१

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि. २१/०३/२०२०

## फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश

**आदेश:-**

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक १ अन्वये जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे.

आणि ज्याअर्थी, सद्यस्थितीत संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्रात बहुतांश भागात करोना (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजाराचे रुग्ण आढळून आले असून, करोना (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजार असल्याने उस्मानाबाद जिल्हयात गर्दीच्या /सार्वजनिक ठिकाणावरील कार्यक्रमाचे आयोजन केल्यास करोना (कोव्हिड१९) विषाणूंचा मोठया प्रमाणावर फैलाव होवू शकतो. करोना विषाणुचा फैलाव वाढु नये यासाठी व त्यास प्रतिबंध करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी नागरीकांनी एकत्र येण्यास तसेच सार्वजनिक ठिकाणच्या कार्यक्रमास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. करोना (कोव्हिड १९) विषाणुंचा प्रादुर्भाव ही एक राष्ट्रीय आपत्ती असल्याने, आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या अनुषंगाने उस्मानाबाद जिल्हयातील सभागृहे, मंगल कार्यालये, बंद ठेवणेकामी तसेच धार्मिक कार्यक्रम (लग्नकार्य/विधी/रिसेप्शन इत्यादी) घरगुती पध्दतीने घरच्या घरी करण्यासाठी दहा किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र जमण्यास मनाई करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागु करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक २१/०३/२०२० रोजीपासून ते पुढील आदेश होईपर्यंत (सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीसाठी ) उस्मानाबाद जिल्हयामध्ये खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१. प्रशासनाच्या पुर्व परवानगी शिवाय कोणत्याही धार्मिक/यात्रा/मेळावे/विविध प्रकारचे प्रदशने/ आठवडी बाजार/जनावरांचे बाजार भरविणे इत्यादीचे आयोजन करण्यास मनाई करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

२. उस्मानाबाद जिल्हयामधील खाजगी अथवा सार्वजनिक इत्यादी सर्व प्रकारची सभागृहे, मंगल कार्यालये, सभामंडपे चालु ठेवण्यास मनाई करण्यात येत आहे. (शासकीय बैठक, प्रशिक्षण कार्यक्रम वगळून)

३. कोणतेही धार्मिक कार्यक्रम (लग्न कार्य/विधी/रिसेप्शन इत्यादी) घरगुती पध्दतीने घरच्या घरी करण्यासाठी दहा किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र जमण्यास मनाई करण्यात येत आहे.

४. उस्मानाबाद जिल्हयातील सर्व चित्रपटगृहे, फिरते चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृहे, म्युझियम, कलाकेंद्रे, पर्यटनस्थळे, डिमार्ट, मॉल्र्स, तंबाखु व तंबाखुजन्य धुम्रपानाचे पदार्थ इत्यादीची विक्री करणारे सर्व दुकाने/ पानटप-या, चहा ,नाष्टा, रसवंती, रेस्टॉरंट, आईस्क्रीम पार्लर, स्विटमार्ट, बेकरी, फास्टफुड उदाहरणार्थ वडापाव, भेळ, पाणीपुरी इत्यादी पदार्थांची विक्री करणारे दुकाने/फिरते विक्रेते यांची दुकाने तसेच आधार नोंदणी केंद्रे / आपले सरकार सेवा केंद्रे, सीएससी केंद्र, महाऑनलाईन केंद्र चालु ठेवण्यास मनाई करण्यात येत आहे.

५. जिल्हयातील सर्व सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, क्रिडाविषयक कार्यक्रमांना मनाई करण्यात येत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक २१/०३/२०२० रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद

**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद
४. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
५. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
७. जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र.जि.का. उस्मानाबाद
८. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
९. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि. प. उस्मानाबाद
११ जिल्हा उपनिबंधक, सहाकारी संस्था, उस्मानाबाद
१२ चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समिती, उस्मानाबाद
१३.उपविभागीय दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१४.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं./सा. प्र./एकात्मिक बालविकास/स्वच्छता व पाणीपुरवठा जि.प. उस्मानाबाद
१५.तालुका दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१६.शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक, जि. प. उस्मानाबाद
१७.गट विकास अधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१८. मुख्याधिकारी, नगर पालिका, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, मुरुम, भुम, परंडा, वाशी , कळंब यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
१९.जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, व्दारा शासकीय तांत्रिक विद्यांलय, तळमजला उस्मानाबाद
२०. विभाग नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, उस्मानाबाद

21/3/20
जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद

Scanned by CamScanner